२०४

वंदेमातरम् ।

शाहीरी .... .... .... डफ

# पोवाडा ८ वा

# पुण्यस्मरण

—लेखक—

प्रल्हादराय
जळगांव पू. खा.

शके १८५६ ] आवृत्ति १ ली [ सन १९३४

मूल्य १ आणा.

२५९

वंदेमातरम् ॥

शाहिरी———डफ

# पोवाडा २२ वा

स्वातंत्र्यवीर

# बॅ. वि. दा. सावरकर यांचा

# पोवाडा

ले. कविभूषण महाराष्ट्रशाहीर

प्रल्हादराय जामखेडकर, जळगांव ( पू. खा. )

प्रथम प्रकाशन) मूल्य ६ आणिकम (शके १८६८

169-1



कविभूषण, महाराष्ट्र शाहीर
प्रल्हादराय जामखेडकर

# प्रस्तावना

स्वा. सावरकरांचा हा सुंदर पोवाडा श्री. कविभूषण प्रल्हादराय शाहीर ऊर्फ जामखेडकर यांनीं रचिला आहे. तो माहितीच्या दृष्टीनें शुद्ध; चालीच्या दृष्टीनें श्रुतिमनोहर आणि रसाचे दृष्टीनें फार परिणामकारक वठला आहे असें मला वाटतें. तो जामखेडकर यांचे तोंडून ऐकत असतां फार आनंद वाटला. या पोवाड्याचा प्रसार खेड्यापाड्यापर्यंत झाला पाहिजे पोवाड्याचे एकूण अकरा चौक असून पहिल्यांत जन्म व बालपण, दुसऱ्यांत पुण्यांतील पहिल्या प्लेगचें वर्णन, चौथ्यांत परदेशगमन, पांचव्यासहाव्यांत नासिकच्या चळवळी, आठव्या, नवव्या व दहाव्यांत समुद्रोड्डाण, खटला व शिक्षा व अकराव्यांत हिंदुउत्थापनाची चळवळ इ. विषय आलेले आहेत.

पुणें. दिनांक २७ – ११ – ४६.

य. न. केळकर

# शाहिराचा मुजरा

स्वा. बॅ. वि. दा. सावरकर यांचा पोवाडा मीं दि. १ मे १९०२ सालीं लिहून त्याच वर्षीं ठिकठिकाणच्या श्रीगणेशोत्सवांत गाऊन दाखविला. हा पोवाडा प्रसिध्दीला जावा अशी इच्छा. पण बंधनाचे अडचणीमुळें हा योग आजपर्यंत आला नाहीं व या पोवाड्याचें प्रकाशन श्री. दादाराव केतकर यांचे मार्फत व्हावें या हेतुप्रमाणें कालांतरानें का होईना हा योग जुळून आला व त्यामुळेंच या पोवाड्यांत लिहिलेला काव्यमय इतिहास मला स्वानुभवामुळें तंतोतंत जनतेपुढें स्मरला तसा ठेवतां आला. यांतील फक्त समुद्रावरील प्रसंग मात्र श्री. तात्याराव यांना विचारून लिहावा लागलेला आंहे. तसेच सा. सम्राट दे. भ. न. चिं. केळकर व श्री. य. न. केळकर आणि दादाराव केतकर या त्रिवर्गांचे शाद्बिक आभार (' काय म्यां पामरें बोलावी उत्तरें ' या साधुवार्णाप्रमाणें) मानण्यास मन ग्वाही देत नाहीं. हा सुयोग दादाराव केतकर यांचेमुळें आल्यानें मी सर्व क्रांतिवीरांस अत्यादरानें हा शाहीरी मुजरा करीत आहे.

जळगांव (पू. खा.)
दि. १-१२-४६.

सर्वांचा कृपाभिलाषी
प्रल्हादराय जामखेडकर.

१०१-1

जय हिंदमाता

शाहिरी——————डफ

## पोवाडा २२ वा

स्वातंत्र्यवीर

# बॅ. वि. दा. सावरकर यांचा
# पोवाडा

ले. :—कविभूषण महाराष्ट्रशाहीर
**प्रल्हादराय जामखेडकर.**

किति झाले गेले असतील । पुढें होतील । आज असतील । स्वातंत्र्य-वीर भरतखंडांत । सावरकर मेरुमणी हो त्यांत । प्रल्हादराय गुंफी माला कवनांत ।।धृ.।।

### चौक १ ला — (जन्म व बालपण)

भगूरगाव नासिक जिल्ह्यांत । आहे लभी ख्यात । आलम दुनियेंत । आठराशें त्र्यायंशी मे महिन्यांत । दामोदरपंत यांचे घराण्यांत । जन्मला वीर विनायक ख्यात ।। पोराचे पाय पाळण्यांत । दिसती दुनयेंत । तीच गत यांत । मातृ-भूमीचा कळवळा फार । खेळ खेळतां दिसे आनिवार । विनायक खराखरा बाणेदार ।। स्वराज्याची लागलि तळमळ । जिवास मळमळ । करावी चळवळ । देशासाठी शीर घेवून हातांत । तराहितराहि करूं आम्ही गनीमास । भडकवूं जाळ सम्द्या हृदयांत ।। चालः— गुलाम करून काळ्या आदमिला । ढंडोरा त्यानं पिटविला । अन्याय खपत नाहीं मुळी मला । येशू

खिरस्त सांगुनी गेला । तारून आलम दुनियेला । हळुंहळुं गिळंकृत करा तुम्ही सर्वाला ।। गोरा राजा छान हा आला । आवडला कैक लोकाला । रामराज्य वाटलं हो त्यांना । धर्मराजा जणुं हा आला । असं वाटलं कांहीं लोकाला । दुर्दीन गेले विलयाला । आली धुंद त्याचे डोळयाला । निःशस्त्र करून परजेला । गोरा म्हणतो आपले मनाला । कोण येतो माझे सामन्याला । करीन राज्य सर्व देशाला । देशभक्त दिसतांच डोळयाला चढवीन फांसाला ।। चालः– आठराशें सत्त्याण्णव सालीं प्लेग उसळला ।। मूळ आले प्लेगोबा सर्वांना नेण्याला ।। लहान थोर पाहिना पहा अन्तकाळाला ।। रानावनांत गेला होता कैक लोक रहाण्याला । तेथेहि गाठुनी नेतो पहा स्वर्गाला ।। चाल ।। . प्लेगानं केला कहर । त्यावेळीं म्हणें सरकार ।। कायदा केला पाहिजे जोरदार । सोडण्या सर्व घरदार ।। (मिळवणी) पाहातां पहातां झाला आकांत । लागेना अंत । पुणे शहरांत । जिवाची आस नाही कोणास । घरांना कुलपें लागलि पार । ल्पेगानें केला असा संहार ।। १।।

## चौक २ रा — (पुण्यांतील प्लेग)

पहा हुकुम केला साहेबानं । लक्ष ठेऊन । ऐकाहो जन । प्लेग जरी झाला घरीं कोणास । ठेवावें घरांत एकलें त्यास । आणि घर द्यावें सर्व ताब्यांत ।। चीज वस्तु जावी ठेवून । प्लेगाच्या जंतूनं । गेली भरून । धुवून करूं साफ सर्व घरदार । कपडेहि जाळून टाकूं आम्ही पार । क्वारंटाईन मध्यें रोगी नेणार ।। धुमाकूळ केला शिपायानं । पेठेपेठेंतून । जबरदस्तीनं । खबर मिळतांच हुसकिती त्यास । प्लेगोबा बरा वाटे चित्तास । शिपाई नको नको घरांत।। चालः– घरांतील वस्तु फेकिती पहा रस्त्यांत ।। चोरापोरी लुटालट होते तेथें हातोहात ।। औषधावांचून रोगी मेला घरांत ।। कोण खबर देतो कशाला त्याचे आप्तास ।। कुच फिकर नही मरगया तो मरना देव ।। हैवही गेले दैवही गेलें धुपटणें हातांत ।। चालः– असा कहर पुणें शहराला । तवा वाटल काय लोकाला । टोपीवाला फार मातला । स्वराज्याच्या करून होळिला । पेशवाई दिली फासाला । गोडगोड देऊन थापेला । सत्ता घेउन आपले हाताला चकवून पारधी धूर्त कसा तो झाला ।। शिरशिरी आलि अंगाला । अंतरीं

भडकती ज्वाला । तरुणांनीं निश्चय केला । करूं ठार रँडसाहेबाला । हाच उपाय आहे याजला । असा विचार करून सदरेला । गाठून गणेश खिंडीला । जागचे जागीं रँडसाहेबाला ठार हो केला ॥ चाल:– पसरलि आग शहरांत । पकडले लोक कित्येक ॥ हालहाल केले आटोकाट । धायधाय लोक रडतात ॥ (मिळवणी) विश्वासघात केला द्रविडानं । स्वार्थि होऊन । दिलें धरून । चाफेकर बंधु गेले फासास । बाळटिळकांना ठेवलं तुरूंगांत । चाहडिचा खेळ सारा हा खास ॥२॥

## चौक ३ रा — (कार्यारंभ)

अशी वार्ता अैकून मन । गेल भडकून । बोले झटकन । मरणाची भिती नाहीं आम्हास । शूरवीरांचे लेणें हें खास । स्वातंत्र्यास्तव जाळी देहास ॥ तोच देशभक्त हो खरा । कंठांतील हिरा । देविच्या पुरा । चेतवी ज्योत तरुण हृदयांत । देशभक्तीचें वाण हातांत । घेऊनी झुंजती ते समरांत ॥ कोल्हे कुत्रे मरती आनेक । रोगानें लोक मरती पटापट । वीराचें मरण द्यावें आम्हांस । देवा मागणें मागतों तुम्हांस । फितूऱ्याचा देऊं नको सहवास ॥ चाल:– मित्रमेळा त्यांनीं स्थापिला । गोविंद शाहीर त्यांचे संगतिला । पोवाडयाचा छंद एकाला। दुजा करी वीर कवनाला । मी होतों त्याच मेळ्याला । अभिनव तरूण भारताला । जागजागीं त्यानं स्थापिला । गोऱ्याच्या पोटीं भितीचा गोळा अूठला ॥ मंग आला पुणें शहराला । रेसिडेन्सीमध्यें रहाण्याला । लेख दिले काळ पत्राला । असा दीनक्रम चालला । स्वदेशीचा छंद लागला । अुपदेश करी सर्वाला । द्या फेकून विदेशी वस्त्राला । असं म्हणून जागजागीं सभा त्यानं भरविल्या ॥ चाल:– तरुणांच्या अंतरी पोत पहा चेतला ॥ त्यागाच्या तेलानें त्यांनीं त्याला रक्षिला ॥ मरणाच्या भितीनें कोणी नाहीं लचका ॥ अेकोणिसशे अेकसालाला देश जागला ॥ चाल:– द्या सद्रा कोट जाकीट । धोतरें घरांतिल चीट ॥ बांधून आणावी मोट । द्यावीरे बीन बोभाट ॥ (मिळवणी) फाळणीचा कायदा हो झाला । अेक सालाला । बंगाल प्रांताला । भडकली होळी लागली आग । विदेशी माल जाळी जागोजाग । सरकारास आला त्याचा मग राग ॥३॥

## चौक ४ था — (परदेशगमन)

अफझल बाजीरावाचा । आणि तान्हाचा । लक्ष्मीबाईचा । पोवाडा केला त्यानं जोरदार । सरकारास वाटलें फिरलें घरदार । त्यामधे आहुती खास पड-णार ।। बी ओ झाला योग्य समयाला । अेलअेलबी होण्याला । सिध्द जाहला । मुंबअीस होता त्याचा मुक्काम । सी. आय डी. झाली तवा घामोघाम । नजर ठेविता झाली दाणादाण ।। शामकृष्ण वर्मा पंडीत । फार विख्यात । आलम दुनियेंत । उदार तो झाला भरतखंडांत । स्कॉलरशीप ठेवली त्यानं समयास । ज्ञानाची पूर्ण वाढ होण्यास ।। चाल... शामजीला अर्ज तो केला । स्कॉलर-शीप द्यावी हो मला । मी जाईन परदेशाला । ब्यारिस्टरी तेथे शिकण्याला । टिळकांचं साह्य समयाला । स्कॉलरशीप मिळाली त्याला । जाण्याचा बेत ठरविला । मित्रगण आला भेटीला । बोलतीं एकमेकाला । बाळकडू दीलस आम्हांला । देशसेवा नित नेमाला । आशी राखी बांधून हाताला । चटका लावून आम्हास चालला परदेशाला ।। बोलला मित्रगणाला । चिंता नको नको तुम्हाला । जाईन तेथें धूमाकूळ उडवीन ठेवा ध्यानाला ।। चाल:—स्वातं-त्र्यदेविची पुजा नीत नेमाला ।। तेथेंही जपूं आम्ही स्वातंत्र्याची जपमाला ।। लौकरच परतून येईन तुमच्या भेटीला ।। नका नका पाणी आणूं तुम्ही तुमच्या डोळयाला ।। पण तुम्ही येथेंही लागा देशसेवेला ।। चाल:- शीळ मारलि पहा बोटीनं । चालली त्याला घेवून ।। निर्दय खरोखर बोट । केली तीनें त्याचीताटातुट ।। (मिळवणी) विनायक बोले गर्जुन । नित्य सेवीन । मातृभू-चरण । हिंदू हा श्रेष्ठ सर्व जगतांत । कधी ना अणू रेणू तो खास । साज पटवीन साऱ्या जगतांत ।। ४ ।।

## चौक ५ वा— (परदेशांत)

टाकोटाक विलायतेस गेला । अग्निचा गोळा । स्थापी संघाला । चेतवी क्रांती तरुण हृदयांत । बामगोळा शिकण्याचा तो ध्यास । प्यॅरिस शहरीं गेले तरुण ते खास ।। बामगोळे पडती धडाधडा । कायदा हा मोडा । सवाल रोकडा । बंगालची फाळणी रद्द करण्यास । टिच्चून मारिती गोऱ्या साहेबास । धावपळ झाली साऱ्या राज्यांत ।। भडकला आग्या वेताळ । घालि

धूमाकूळ । काळ ना वेळ । लाल बाल पाल नेले तुरुंगांत । शिवरामपंत गेला गेला जेलांत । कैकांच्या गळीं फासाची लाथ ।। चाल :– प्रसिद्धीला जोसेफ म्यझीनी । गौरविला सर्व लोकांनीं । शेकडोशें प्रती घेतल्या पहा जनतेनी ।। सत्तावनच्या क्रांती युद्धाला । लिहिलें त्यानं समयाला । जन्मा आधिच पुस्तक गेलें बंदीवासाला ।। इंग्लंडांत प्रकार काय झाला । सर कर्झन वायली लाल-काका । चालला होता भर रस्त्याला । जाग्चे जागीं धींग्रानें त्याला ठार हो केला । सरकारनं पकडल त्याला । निषधाच्या सभा भरविल्या । ठराव मांडला वेळीं सभेला । मदनलाल धिंग्रा हा पूर्णपणें वेडा झाला ।। सावरकर करी विरोधाला । अैकून विरोधी शब्दांला । सारा गोरा चवताळून गेला । बोलती एकमेकाला । हाणा मारा ठोका हो चोपा तुम्ही त्याजला ।। अितक्यांत डोळ्या-वर गोरा मारी बुक्कीला ।। बुक्कीसरस फोडलं डोळयाला । रक्ताची चिरकांडी लागली तवा उडण्याला ।। अन ठोकला त्यानं गोऱ्यांला । ठोकरिसरसा गोऱ्याला खालि यानं लोळविला ।। चालः–सभेंत झाला सारा गोंधळ गेले पळून । न्याय-सनी धिंगऱ्याला गेले पहा घेअून ।। धिंगऱ्यानें जोरदार केलें तेथें भाषण ।। गोऱ्यांनीं घातला मत देशी धुमाकूळ ।। म्हणूनच घेतला गोऱ्याचा मी प्राण ।। चालः– जाहलि फाशिची शिक्षा । मागेना प्राणाची भीक्षा ।। लक्षांत लक्ष सच्चा । खऱ्या खऱ्या हिंदुचा बच्चा ।। (मिठवणी) वीराग्रणी बोले मर-तांन । मातृभूमिला । मुक्त करण्याला जन्म घेईन पुन्हां पुन्हां खास । न्यायाची ध्वजा धरून हातांत । करीन मी ठार देशासाठीं पार ।। ५ ।।

## चौक ६ वा — (नासिक)

विनायकास बंधू होते दोन । वडील गणेशपंत । धाकला नारायण । प्रसिद्धलें बूक त्यानं नाशकास । रणाविण स्वातंत्र्य मिळालें कोणास । राजद्रोहि म्हणून धरलें बाबास ।। अेकोणीसे नअू सालांत । नासिक कोर्टांत । खटला प्रख्यात । मुख्य आरोपीं बाबाराव त्यांत । देशीचें वीरकंकण हातांत । बांधुनी गेला अंदमानांत ।। नारायणास नेलें धरून । मोठ्या त्वेषान । ठेवला डांबून । बाम्प्रकर्णाचा होता आरोप । ट्रायलसाठी ठेवला त्याला जेलांत । रोष होतांच मोडला संसार ।। चाल:– बायकांना नाहीं घरदार । पोटांसाठी फिरती दारोदार । जीव

नको झाला खरोखर । टाळकुटयांच्या देवळांत नित्य तिचा व्यवहार ।। हें देऊळ मसन खाईला । धडधडत्या चिता सोबतीला । तोच उजेड तिला रात्रीला । एकच वस्त्र आंगाला । दगडाची गादी झोपण्याला । वटवाघळी फक्त जोडीला । पहावेना तिच्या हालाला । तवा दया आलि काळाला ।। झटपट काळानें नेली तिला सदनाला ।। मुक्त झाली बिचारी मुकली साऱ्या व्यापाला ।। ऐकाव पुढं गोष्टिला । बंदि केली देशी येण्याला । ब्यारिस्टरी येथें करण्याला । सनद मिळेना हो त्याजला । नाशकांत प्रकार काय झाला । नासिक त्र्यंबक रस्त्याला । साहेब चालला होता फिरण्याला । तांग्याची काढणी हाताला । गाडी चालली होती रस्त्याला । भडकतां बैल आडवे आले तांग्याला ।। लाथेनं मारलं हो त्याला । लाथ बसतां नाजुक भागाला । ठोकरी सरसा गाडीवान मेला जागचे जागेला ।। दवाखान्यांत नेलं प्रेताला । चिरफाड केली स्टेजला । आन केला मुलाच्या हाताला । केस गेली होती कोर्टाला । डॉक्टरी अभिप्राय आला । लिव्हर वाढली होती पोटाला । म्हणूनच लाथेनं मेला । काय करावं आम्ही हो त्याला । खूनांतून मुक्त हो केलं त्यांनी साहेबाला ।। गाडिवान बिचारा फुकट मुकला प्राणाला ।। (मिळवणी) न्यायाचा संपला बाजार । कोपले वार । मूळी ना धीर ।सूड सूड गर्जले अेकमेकांत । गुप्त सभा झाली तेथें बाडयांत । पुढील कथा ऐका पुढील चौकांत ।। ६ ।।

## चौक ७ वा— (नासिक चाल)

जाक्सन साहेब नासिक जिल्हयाला ।। कलेक्टरचा अधिकार त्याला । बदली झालि त्याची बॉम्बेला । पानसुपारी झाली गल्लोगल्ली त्यास नासकाला ।। नाटकाची आवड फार त्याला । किर्लोस्कर मंडळी होती तवा नासकाला ।। शारदा नाटक लावलें पहाण्याला । खूप गर्दी झाली थेटराला । साहेब येणार होता बघण्याला । पण आला नव्हता येळेला । पाहती त्यांचे वाटेला । खेळ सुरु नव्हता हो झाला योग्य वेळेला ।। वाघ बसला होता दाराला साहेबाला ठार करण्याला । कान्हेरे म्हन्ती हो त्याला । आला बघा साहेब दाराला ।। धाडधड बार तवा झाला । शिपाय शिपाय मारी हाकेला । गोळी-सरसा साहेब मेला । आन धाडकन पडला जमीनिला । पण काय वाटलं

लोकाला । सन्मानार्थं बार हा झाला । आधिकारी होते नाटकाला ।आन चटकन धावले जागेला । कुलप ठोकिलि त्यानी द्वाराला । पळशीकर घरीं कान्हेऱ्याला । खरा परकार कळता लोकाला । जो तो भिवून आपल्या जिवाला । वाट मिळेल तेथूनी लोक निघोनी गेला ॥ पकडले कैक लोकाला । चाप दिले नाजुक भागाला । टाळुला असत्याचा टिळा । मलमूत्र घाली तोंडाला । अशा सांगू किति गोष्टीला । यमपुरी भासली तवा सर्व लोकाला ॥ केस चाल्ली योग्य समयाला । अेकशे अेकवीस आणि खुनाचा चार्ज ठेविला ॥ चाल:– केला कट सर्वांनी पहा राज्य घेण्याचा ॥ हालहाल केले तरी कोणी कांहीं वळेना ॥ कान्हेरे कर्वे देशपांडे दिले फांसाला ॥ त्यांतील कांहीं जण गेले काळाचा पाण्याला ॥ केळकर चंद्रात्रे डावरे गेले शिक्षेला ॥ ब्रम्हगिरी बुवाही गेले त्यांचे जोडिला ॥ सारी नांवें सांगतां अिस्तार होअील कवनाला ॥ यांतील चालक आहे अिंग्लड शहराला ॥ सावरकर धरुन आणावा तुम्हीं नासकाला ॥ असा हुकूम केला कोर्टानं त्याच येळेला ॥ घरभेद्या गेला होता त्यास येथें आणण्याला ॥ (मिळवणी) असा छळ महाराष्ट्रांत । आग जाळीत । दीन दुबळ्यास । किडामुंगीवानी भरडले पार । दया लोपली फिरलें घरदार । हुकूमशहाचा सारा कारभार ॥ ७ ॥

## चौक ८ वा (परदेशांतून परत)

प्यारिस शहरीं होता विनायक । व्याप अनेक । लागली भूक । स्वराज्य घेण्याची पूर्णपणें त्यास । मादम कामा शामकृष्ण साहयास । म्हणती सेनानी तूंच रे खास ॥ फरान्सांतून जाता सेनानी । होईल ती हानी । दुर्दैवानी पकडून नेले जरी तुम्हास । घात होईल सर्व कार्यांत । नका नका जाऊ अिग्लंडांत ॥ चवताळून बोलला वीर । नका सोडू धीर । प्राणाहून प्यार वडील बन्धू गेले काळ्या पाण्यास । धाकला भाअू ठेवला तुरुंगांत । तसेंच सोंगडे गेले फासास ॥ चाल:– मंग निघाला वीर तेथून । ताबडतोब गाठलं बंदर । आगगाडींत चालला बसून । अिग्लंडचं येतां स्टेशन । त्याच्या आधीं शिपायी येअून । बसले होते दबा धरून । हियर हियर म्हणून वेढा दिला चोहांबाजूनं ॥ तात्काळ पकडलं त्याला । बोस्टल तुरुंगांत नेला । बंदीवान करोनी नेती जन्मभूमीला ॥ बोट चालिल त्याला घेऊन । विचारांनीं घेरलं

मन । अंत:करण गेलं वेधून । कसा जावं आता येथून । सोल्जर चोहि बाजून । संगिनी हातीं घेऊन । युक्ती आलि डोक्यांत स्वस्थ झालें तें मन ।। बोट आलि फरेंच हाद्दीला । घाई-घाई म्हणें शिपायाला । परसाकडं लागलं हो मला । घेऊन चला आतां झाडयाला । शेतखान्यांत पहारेवाला घेऊन गेला त्याजला ।। कांच ठेवली होती बघण्याला । कोटानं झाकलं काचेला । साबूचा फेस आंगाला । लावून तयार तो झाला । आतां सांगन पुढच्या भागाला पुढच्या चौकाला ।।८।।

## चौक ९ वा — (बोटींतून पलायन)

समुद्राची केली प्रार्थना । देशभावना । तुला ठावना । साह्य होवून न्यात्र तीरास । हातावर खेळदीत खेळवीत बाळास । नाहीं तर ठाव देई हृदयांत ।। समुदर हासला खुदकन । मोठ्या जोरानं । लाटा उसळून । संमती दिली त्यानं बेतास । घे घे उडी पसरले हात । फुलावानी नेतो पैलतिरास ।। उडी घेतली त्यानं समुद्रांत । अति आनंदांत । हात पसरुन । कवटाळून धरलं त्यानं हृदयास । हिंद देशाचे पंचप्राणास । पुढें सरकवी त्यास हातोहात ।। चाल:—कसा काय निसटला सांगतों तुम्हांला ।। संडासाच्या भोंकांतून हळुहळु सरकला ।। जागजागीं खरचटलं होत त्याचे अंगाला । पोहोत पोहोत चालला होत पैलतीराला ।। चाल:—संशय आला पहारेवाल्याला । हांक मारलि सावरकराला । ओ देण्यास सावरकर होता तेथें का बोला ।। लाथेनं फोडलं दाराला आन शिवी हासडली त्याला । धावा पळा सावरकर गेला । जमा झाले सर्व डेकला । पहातांना आजूबाजूला । पोहोतांना पाहुचल हो त्याला । आधिकारी म्हणें सर्वांना । गोळी चालवा ठार करण्याला । पावसावानी वरसल्या गोळया । बुडी मारून चुकवी गोळयाला । धैर्यानं चालला तीराला । नांवा सुटल्या त्यास धरण्याला । संकट पुन्हा वाटेला । मार्सेलिसच्या येता धक्याला । भितिचा पहाड सामन्याला । पन्नास फूट उंचो ती त्याला सारा शिपाई लागला पाठिला । जागा नव्हती वर चढण्याला । बलभीम अंगीं संचारला । सरासरा चढोनी वरती निघोनी गेला ।। फरेंच शिपायी पाहिजे होता त्याला । धावत धावत चालला रस्त्याला, पळतांना धामाधूम झाला । पोलिस पोलिस म्हण धावतांना सर्व मार्गाला ।। ब्रिटिश शिपायी होते पाठिला । चोर चालला पकडा

हो त्याला । असा गिल्ला त्यांनीं चालवि॰ा । फरेंच शिपायी गावला तो त्याला । शिपायी दादा सांभाळा मला । माजिस्ट्रेट दाखवा आम्हाला । घेवून चला त्याचे सदरेला । फरेंच्याची हद्द ही ठाऊक आहे तुह्माला ।। ब्रिटिश शिपाई आला धरण्याला । देऊ नका त्याचे ताब्याला । फरेंच शिपाई म्हणे ब्रिटिशाला । कैदी देणार नाहीं ताब्याला । सत्य वाटत बोलणं त्याच मला । दंगामस्ती करून वेळेला । सोन्याचा गोळा साहयाला । जोड गोळी आणून कामाला । खेचित खेचित सावरकर नेला त्यानीं बोटीला ।। (मिळचणी) दैवाचा अुलटला फासा । आडकला मासा । होता भरवसा । फरेंच होतील सहाय आम्हाला । उपयो॰ झाला नाहीं मुळी त्यास । अशा मातोंत मिळाली खास ।।९।।

## चौक १० वा ( परत व खटला)

चढविलं त्याला बोटीला । बेड्या ठोकल्या हातापायाला । करकचून काढण्या आंगाला । लाथाचा खुराक त्याजला । शिवीगाळि नीतनेमाला । खडखडीत बोल्ला साहेबाला । खबरदार सांगतो तुम्हाला । प्राण घेईन जागचे जागेला । ताजा अनुभव आहे तुम्हाला । हिंदु तरुण नाहीं मेलेला । जीवावर उदार झालेला । हें ठाव आहे तुम्हाला । चूप बैस आतां जागेला । अपमान ठावं ना मला । जरी केलास अपमान तरी घेईन देईन प्राणाला ।। हादरला साहेब जागेला । गेला नाहीं पुन्हा वाटेला । हळुहळु बोट ती आली मुंबई बंदराला ।। चाल. :– लोक उभे होते वाटेला । स्वागत त्यांचें करण्याला ।। बंदीवान जरी तो झाला । आनंदी स्वागत त्याला ।। पाहून सर्व लोकांला । जयजयकार तो केला ।। चाल:– घेऊन गेले बोरिबंदराला । स्पेशल गाडी उभी स्टेशनाला । ताबडतोब नेला नासकाला । न्यायकोर्टात कटाचा खटला सुरु तो झाला ।। भेटले मित्र कोर्टाला । सर्वांच्या बेड्या पायाला । स्वातंत्र्यदेविचा जयजयकार तो झाला ।। चाल...पन्नास वर्षांची शिक्षा झाली वीराला ।। डोंगरिचा तुरुंग दिला होता त्यास राहाण्याला ।। हालहाल केले चक्की बिळी त्यास दळण्याला ।। तेथून बदले पहा ठाणे जेलाला ।। भेटिचा परवाना दिला

त्यानीं बायकोला ॥ खळखळत्या आश्रुनं भेटती अेकमेकांना ॥ भेटिचा योग येअील खास आपणाला ॥ वीरपत्नि म्हणती ग तुला । अितक्यांत ताटातुट केली वेळ संपला ॥ आलआल चाललं आंदमानी तो गेला ॥ भाअूभाअू भेटले आंदमान बेटाला ॥(मिळवणी) दडपलें तेज राखेंत । होतें धगधगत । आंद-मानांत । अंतरीं ज्योत होती तेवत । हळुहळू विस्तव होता भडकत । रक्षिला त्यांनो मोठया हालांत ॥१०॥

## चौक ११ वा — (सुटका व कार्यारंभ)

चौदा वर्षं केले हाल हाल । त्याला नाहीं मोल । काया आमोल । झिजविली देशासाठी ती खास । शृंखला होत्या हातापायांत । परवशता जाळी ती हृदयांत ॥ क्षयरोग आला धावून । मोठया प्रेमानं । स्थान शोधून, पहाता विनायक दिसे तो त्यास । तसे वी गणेशपंत डोळ्यास । ठाण मांडीलें त्यावें रक्तांत ॥ आरडा ओरडा झाला सगळीकडे । क्रांतीचे सडे । पडती चोहि-कडे । खुनशीपणा द्यावा आतां सोडून । रोगाने गेले पुरे पिजून । सिंहाची नखें चाल्ली भंगून ॥ चाल:— दिले दिले सोडून रत्नागिरीं एकाला ॥ नासिक शहर दाविले त्यानीं बाबारावाला ॥ स्थानबद्ध करून ठेवलें दोन्ही भावाला ॥ कैक वर्षे लोटलीं त्याच जागेला ॥ जमनादास प्रधान होतांच सोडिलें त्यांना ॥ चाल :— आनंद झाला सर्वाला । भेटती एकमेकांना । जो तो म्हणें मिळावें तुम्ही आमचे पंथाला ॥ मग इचार केला सदरेला । लोकमान्य गुरु आम्हाला । तेंच ध्येय आमचे डोळ्याला । चालवूं त्याचे पंथाला । महाराष्ट्र बाणा राखून लागूं कार्याला ॥ चाल :– घेतली हातीं चळवळ । हिंदूचें राखण्या मूळ गर्जना करी घनघोर । पाकिस्तान धुळीस मिळविन ॥ विनवितो देवा शाहीर । दे आयुष्य त्या भरपूर ॥चाल:— पुढे ऐका थोडया गोष्टिला । रक्षावें माता भगिनीला । डोळा उचलून बघतांना तिला । फोडावं त्याच्या डोळ्याला । हात उचलि कुणी मारण्याला । तरी तोडा त्याचे हाताला । ठोश्यास ठोसा देवून राखा धर्माला ॥ विनवितो वीर मर्दाला । सैन्यांत जावं भरतिला । उपयोग होअी तुम्हाला । ठायी ठायी करावी हिंदूची योजना ॥ लागोपाठ सात वेळेला । हिंदुसभापती तो झाला । थोर थोर पुढारी झालें आमचे देशाला ॥ किती गाऊं त्यांच्या कीर्तिला । पण सांगा कोणी आम्हांला । असा मान

मिळाला होता कधी कोणाला ।। त्यागाची ही मूर्ती सार्थ नांव त्याजला । देवेंद्र जसा जाहला इंद्र लोकाला ।। तसा हिंदुपती हा झाला भरत खंडाला।। त्यागपत्र दिलें त्या वेळां । व्याप नको आतां आम्हांला । सहस्रावधी लोकांनीं विनविले त्याजला ।। त्यागपत्र घ्यावें माघारा । हिंदुनीं विश्वास यावरी पूर्ण ठेविला ।। (मिळवणी) उणा अधिक शब्द कवनाला । जरी लिहीलेला। क्षमा भाटाला। करावी विनवी आज सकलास । आठवला तसा लिहीला इतिहास । कटीबंद केला जळगांवात यास ।। हिंदुचे–हिंद नवतेज । हिंदु जनतेंत। तेवतें आज । स्वातंत्र्यवीर देई तो जाग । हिंदु बंधू रे मार्गासी लाग । प्रल्हाद म्हणे मार भितीला लाथ ।। ११ ।।



२७७

# अभिप्राय

साहित्यसम्राट दे न. चिं. केळकर म्हणतात:- कविभूषण शाहीर जामखेडकर यांनीं बॅ. सावरकर यांच्यावर केलेल्या पोवाड्याचें हस्तलिखित मला दाखविलें. तें वाचून पहातां पोवाडा बरा अुतरला आहे असा माझा ग्रह झाला. चरित्र-वर्णनांत विसंगति वगैरे नाहीं. हा पोवाडा हिंदुसभेच्या प्रचारास उपयोगी पडेल व जनतेंत जागृति करील.

पुणें, दिनांक १५-६-४४. न. चिं. केळकर

कविभूषण शाहीर प्रल्हादराय जामखेडकर

१८७८·।

यांचे

# अत्यंत स्फूर्तिदायक पोवाडे

## अेक वेळ अवश्य वाचा व आपले मुलांस द्या

नमन किं. ८।।', मुरारबाजी किं. ८–।।, प्रतापसिंह ८–।।, कैदी महात्मा किं. ८।।', सुधारणा किं. ८–।।, तानाजी किं. ८≡, अफजलखान किं. ८≡, लक्ष्मीबाई किं. '।–, पुण्यस्मरण किं. ८–।।, बापू गोखले किं. ८=, बाजी प्रभु देशपांडे किं. '।', बदामीचा वेढा व मोतिलाल नेहरू किं. ८–।।, रेशनिंग किं. ८–, असावा—नसावा किं. ८–, लावण्या किं. ८–, पृथ्वीराज चव्हाण किं. '।', उन्नति का अवनति किं. ८=, रंगाचा पोवाडा किं. ८–, स्वा. सावरकर किं. ।=.

---

### पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें

**व्हीनस बुक स्टॉल, आप्पा बळवंत चौक, पुणें.**

**रत्नागिरी बुक डेपो, गिरगांव रोड, मुंबई ४.**

**जामखेडकर आणि सन्स, जळगांव पू. खा.**

२७८-गी

मुद्रक–प्रकाशक—वि. गं. केतकर,
महाराष्ट्र मुद्रणशाळा, ६२४ सदाशिव, पुणें शहर